Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३१] शुक्रवार, नोव्हेंबर १४, २०२५/कार्तिक २३, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा.,अ. क्र. ८६

भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, यांजकडून

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९(१) खालील अधिसूचना

क्रमांक कावि-अका-उविअ-भूसंपा.-गो.प्र.-१०४३-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित, शासन असलेल्या चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिसूचना क्रमांक ३११-२०१८, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१८ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांने कलम २१ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटलेली आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यांत येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी, यांस पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची - एक

संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०१-एलए-६५-२०२५-२६, गावः नवेगाव पांडव, तालुका नागभिड, जिल्हा चंद्रपूर. प.ह.नं.- १०.

अ.क्र.	सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक	संपादनाखालील क्षेत्र अदमासे
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	७/१	० २९
२	११/१	० ४०
३	११/३	० ०२
४	३०/२	० ३९
	एकूण . .	१ १०

अनुसूची – दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प.
प्रकल्प कार्याचे विवरण	:-	गोसीखुर्द प्रकल्पा अंतर्गत अड्याळ उपसा सिंचन योजनेच्या बांधकामाकरिता.
समाजाला मिळणारे लाभ	:-	गोसीखुर्द प्रकल्पामुळे १,९०,००० हे. आर क्षेत्रात सिंचनाचे लाभ प्राप्त होणार आहे.

अनुसूची - तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

–निरंक–

अनुसूची-चार

पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

–निरंक–

टीप :-उक्त जमिनीचा बाबत महिती तथा नकाशे भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी, यांचे कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

पर्वणी पाटील,
भूसंपादन अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपूरी.

ब्रम्हपूरी :
दिनांक १० नोव्हेंबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.